## थोडक्यात...

### 'समर्थ' चित्रपट पाहण्याचे आवाहन

**नाशिक ।** अध्यात्म, संस्कार आणि सामाजिक संदेशाची सांगड घालणारा 'समर्थ' हा चित्रपट महाराष्ट्रातील विविध चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होत आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने संत-महंत, धर्माचार्य, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच चित्रपटसृष्टीतील कलाकारांची उपस्थिती लाभणार आहे. याप्रसंगी कुंभमेळा त्र्यंबकेश्वर आखाडा परिषद अध्यक्ष महंत शंकरानंद महाराज भगवान बाबाजी, श्रीमहंत वेदाचार्य पीठाधिश्वर डॉ. अनिकेतशास्त्री महाराज, अखिल भारत हिंदू महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा धर्माचार्य प्रकोष्ठ आणि अखिल भारतीय संत समिती महाराष्ट्र प्रदेश प्रमुख गुरुमाउली पीठाधिश्वर राहुलानंद सरस्वती महाराज उपस्थित राहणार आहेत.

### स्वच्छता मोहीम

**नाशिक ।** राजीवनगरमधील श्री हेरंब गणेश मंदिराच्या पिंपळ पाराच्या परिसरात हिंदू जनसंपर्क कार्यालयाच्या वतीने स्वच्छता व डागडुजीचा उपक्रम राबवण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते सागर देशमुख यांनी स्वतःच्या खर्चातून मंदिर परिसराची पिंपळ पार आणि संपूर्ण आवाराची सफाई केली. पावसाच्या काळात पारावर मोठ्या प्रमाणात शेवाळ जमले असल्याने महिलांचा पाय घसरून अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली होती. या घटनेचे गांभीर्य ओळखून सर्व शेवाळ काढण्यात आले आणि संपूर्ण परिसर स्वच्छ व आकर्षक बनविण्यात आला.

### खड्डे दुरुस्तीची मागणी

**नाशिक ।** नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सध्या जागोजागी पडलेले खड्डे आणि वाढलेल्या अस्वच्छतेमुळे शेतकरी, व्यापारी व वाहनचालक त्रस्त झाले आहेत. पेठरोडवरील शरदचंद्र मार्केटमध्येही मोठ्या वर खड्डे पडले आहेत. पावसामुळे या खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने व्यारावांसह वाहनचालकांना येजा करणे अशक्य झाले आहे. अस्वच्छतेमुळे सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे. प्रशासकांनी तातडीने बाजार आवारातील खड्डे बुजवून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी माजी सभापती देविदास पिंगळे यांनी केली आहे.

# एका क्लिकमध्ये जपला जातो क्षणांचा इतिहास

**नाशिक । आदित्य पोमनार**

मोबाईलच्या कॅमेऱ्यापासून अत्याधुनिक आणि मिरर-लेस कॅमेऱ्यांपर्यंत छायाचित्रणाचे तंत्रज्ञान झपाट्याने बदलले आहे. मात्र, एखादा क्षण टिपून तो कायमस्वरूपी आठवणीत जतन करण्याचे महत्त्व आजही कायम आहे. याच छायाचित्रण कलेचा इतिहास, त्यातील बदल आणि समाजातील योगदान अधोरेखित करण्यासाठी दरवर्षी १९ ऑगस्ट रोजी जागतिक छायाचित्रण दिन साजरा केला जातो. १९ ऑगस्ट या दिवसाला छायाचित्रणाच्या इतिहासात विशेष महत्त्व आहे. लुई दाग्येर यांनी विकसित केलेल्या डाग्युरिओटाइप प्रक्रियेची फ्रान्स सरकारने १९ ऑगस्ट १८३९ रोजी सार्वजनिक घोषणा केली. त्यानंतर छायाचित्रणाच्या क्षेत्रात अनेक तांत्रिक बदल झाले. फिल्म कॅमेऱ्यांपासून डिजिटल कॅमेरे आणि आता स्मार्टफोनपर्यंत छायाचित्रणाच्या तंत्रज्ञानात मोठा बदल झाला आहे. पूर्वी छायाचित्र काढण्यासाठी कॅमेरा, फिल्म आणि त्यानंतर फोटो विकसित करण्याची प्रक्रिया आवश्यक होती. आज मात्र स्मार्टफोनमुळे कॅमेरा प्रत्येकाच्या हातात आला आहे. एका क्लिकमध्ये छायाचित्र टिपता येते आणि काही सेकंदांत ते सोशल मीडिया किंवा डिजिटल माध्यमातून जगभर पोहोचवता येते. त्यामुळे छायाचित्रण केवळ व्यावसायिक छायाचित्रकारांपुरते मर्यादित राहिलेले नाही.



मात्र, छायाचित्रण म्हणजे केवळ सुंदर दृश्य टिपणे नाही. घटना, व्यक्ती, भावना आणि समाजजीवनाचे दस्तऐवजीकरण करण्यामध्ये छायाचित्रांची भूमिका महत्त्वाची आहे. एखाद्या घटनेचे शब्दांत केलेले वर्णन माहिती देऊ शकते; मात्र योग्य क्षणी टिपलेले छायाचित्र त्या घटनेचा परिणाम आणि वास्तव अधिक प्रभावीपणे समोर आणते. अनेक ऐतिहासिक घटना आणि सामाजिक बदलांचा मागोवा आज छायाचित्रांमधून घेता येतो. नाशिकमध्येही पावसाळ्यातील निसर्ग, गोदावरी घाट, धार्मिक सोहळे, बाजारपेठा, ग्रामीण जीवन, शहरातील बदल आणि दैनंदिन जीवनातील विविध प्रसंग छायाचित्रकारांसाठी महत्त्वाचे विषय ठरतात. विशेषतः मोबाईल फोटोग्राफीमुळे तरुणांमध्ये छायाचित्रणाची आवड वाढताना दिसते. त्यामुळे जागतिक छायाचित्रण दिन हा केवळ कॅमेऱ्याचा उत्सव नसून क्षण टिपण्याच्या कलेसोबत समाज आणि काळाचा इतिहास जतन करण्याची आठवण करून देणारा दिवस ठरतो. आजच्या डिजिटल युगात छायाचित्र बदलले असले, तरी एका क्षणाला कायम स्वरूपी जिवंत ठेवण्याची त्याची ताकद मात्र कायम आहे.

**जागतिक छायाचित्रण दिन विशेष**

## मोबाईलच्या कॅमेऱ्यापासून प्रोफेशनल फोटोग्राफीपर्यंत

**नाशिक । स्वामी होळकर**

आजच्या डिजिटल युगात छायाचित्रण केवळ आठवणी जपण्याचे माध्यम न राहता संवाद, व्यवसाय आणि सर्जनशीलतेचे प्रभावी साधन बनले आहे. स्मार्टफोनमधील अत्याधुनिक कॅमेऱ्यांमुळे सर्वसामान्य व्यक्तीलाही क्षण टिपणे सहज शक्य झाले असून, त्याचबरोबर प्रोफेशनल फोटोग्राफीची मागणीही विविध क्षेत्रांमध्ये वाढताना दिसत आहे. पूर्वी चांगले छायाचित्र काढण्यासाठी महागडा कॅमेरा, विविध लेन्स आणि तांत्रिक ज्ञान आवश्यक मानले जात होते. मात्र, तंत्रज्ञानातील बदलांमुळे आज स्मार्टफोनमध्येच उच्च दर्जाचे कॅमेरे, पोर्ट्रेट मोड, नाईट फोटोग्राफी आणि एआय आधारित फीचर्स उपलब्ध झाले आहेत. त्यामुळे फोटोग्राफीची सुरुवात करण्यासाठी मोठी गुंतवणूक आवश्यक राहिलेली नाही. नाशिकमध्ये लग्नसोहळे, धार्मिक उत्सव, पर्यटन, जाहिरात, सोशल मीडिया आणि डिजिटल कंटेंटच्या वाढत्या वापरामुळे फोटोग्राफी क्षेत्राला नवीन संधी निर्माण झाल्या आहेत. विशेषतः तरुणांमध्ये मोबाईल फोटोग्राफी, स्ट्रीट फोटोग्राफी आणि सिनेमॅटिक व्हिज्युअल्सची लोकप्रियता वाढत आहे. मात्र, फोटोग्राफी केवळ कॅमेरा किंवा मोबाईलच्या गुणवत्तेवर अवलंबून नसून प्रकाश, रचना, क्षणाची निवड आणि छायाचित्रामागील कथा यांना अधिक महत्त्व असल्याचे छायाचित्रण क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे. त्यामुळे तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले तरी छायाचित्रकाराची निरीक्षणशक्ती आणि सर्जनशीलता हीच फोटोग्राफीची खरी ताकद असल्याचे मानले जाते.

## फोटो नको, रील हवी

### नाशिकमध्ये फोटोग्राफीचा फोकस बदलला

**नाशिक । नागेश्वर गोणेकर**

'फोटो काढायचा आहे की रील बनवायची?' नाशिकमधील व्यावसायिक छायाचित्रकारांकडे ग्राहकांकडून येणाऱ्या मागणीत हा बदल आता प्रकर्षाने जाणवू लागला आहे. मोबाईलच्या कॅमेऱ्यामुळे साधे फोटो काढणे सहज झाले असले, तरी लग्न, विवाहपूर्व छायाचित्रण आणि इतर खास प्रसंगांसाठी व्यावसायिक छायाचित्रणाची मागणी कायम आहे. मात्र आता केवळ फोटो काढून घेण्याऐवजी त्यासोबत रील, छोटा व्हिडिओ आणि चित्रपटसदृश दृश्ये तयार करून घेण्याकडे ग्राहकांचा कल वाढला आहे. गोदाघाट परिसरात विवाहपूर्व छायाचित्रण करताना पारंपरिक पोझपेक्षा नैसर्गिक क्षण टिपण्याला प्राधान्य दिले जात आहे. ङ्कनैसर्गिक फोटो काढा आणि इन्स्टाग्रामवर टाकण्यासाठी एक छान रील करून द्या,फ्फ अशी मागणी ग्राहकांकडून होत असल्याचे छायाचित्रकार सांगतात. रामकुंड तसेच जुन्या नाशिकमधील वाडे, घाट आणि पारंपरिक वास्तूंचा वापर अशा छायाचित्रणासाठी केला जात आहे. चित्रपटसदृश दृश्ये आणि हवाई चित्रीकरणासाठी ड्रोनचाही वापर वाढला आहे.

मोबाईलमुळे पासपोर्ट फोटो, साधी छायाचित्रे आणि दैनंदिन कार्यक्रमांचे फोटो काढणे सोपे झाल्याने अशा कामांसाठी व्यावसायिक छायाचित्रकारांकडे येणारे ग्राहक तुलनेने कमी झाले आहेत. त्याचवेळी लग्न आणि विवाहपूर्व छायाचित्रणात फोटोसोबत रील आणि छोट्या व्हिडिओंची मागणी वाढली आहे. त्यामुळे छायाचित्रकारांना कॅमेरा हाताळण्यासोबत व्हिडिओ चित्रीकरण, प्रकाशयोजना, ड्रोन आणि संपादनाचे कौशल्यही आत्मसात करावे लागत आहे. पूर्वी लग्नाच्या छायाचित्रणानंतर अल्बम तयार करणे हा मुख्य भाग मानला जात होता. आता त्यासोबत समाजमाध्यमांवर त्वरित शेअर करता येईल अशी रील आणि छोटा व्हिडिओही मागवला जातो. मात्र अल्बमची मागणी पूर्णपणे संपलेली नाही. डिजिटल दृश्यसामग्रीसोबत आकर्षक आणि कायम जतन करून ठेवता येणारा अल्बम घेण्याकडेही ग्राहकांचा कल आहे. विवाहपूर्व छायाचित्रणासाठी आलेले सुमारे २८ वर्षीय राहुल सोनवणे म्हणाले, ङ्कमोबाईलवर आम्ही रोज फोटो काढतो आणि ते साधे असतात. लग्न किंवा विवाहपूर्व छायाचित्रण हा खास प्रसंग आहे. व्यावसायिक छायाचित्रकाराची प्रकाशयोजना आणि संपादनाची गुणवत्ता मोबाईलपेक्षा वेगळी असते. त्यामुळे आम्हाला फोटोसोबत चित्रपटसदृश व्हिडिओ आणि रीलही हवी होती. लग्नापुरता हा बदल मर्यादित राहिलेला नाही. मातृत्व छायाचित्रण, बालछायाचित्रण, डोहाळे जेवण तसेच खाद्यपदार्थांच्या छायाचित्रणातही आकर्षक फोटो आणि छोटे व्हिडिओ तयार करून घेण्याची मागणी वाढत आहे. कॅफे, हॉटेल आणि खाद्यव्यवसायांकडून समाजमाध्यमांसाठी छायाचित्रे आणि व्हिडिओ तयार करण्याचे कामही छायाचित्रकारांकडे येत आहे. मोबाईलमधून जे सहज करता येते, त्यापेक्षा वेगळे आणि दर्जेदार काम देणे आता महत्त्वाचे झाले आहे. ड्रोन, योग्य प्रकाशयोजना आणि सर्जनशील संपादनामुळे व्यावसायिक छायाचित्रणाला अजूनही मागणी आहे. त्यामुळे फोटो काढण्यासोबतच ग्राहकांना त्यांच्या प्रसंगाची रील आणि व्हिडिओही देण्यावर आम्ही भर देत आहोत,फ्फ असे छायाचित्रकार प्रतीक दंडगावल यांनी सांगितले. जागतिक छायाचित्रण दिनाच्या पार्श्वभूमीवर नाशिकमधील हा बदल विशेष लक्षवेधी ठरत आहे. मोबाईलमुळे फोटो काढणे सोपे झाले असले, तरी खास प्रसंगातील क्षण जतन करण्यासाठी व्यावसायिक छायाचित्रकारांची गरज कायम आहे.

## एक वृक्ष, मुलीची आठवण उपक्रम

**पळसे ।** स्वातंत्र्य दिनाच्या मुहूर्तावर पळसे येथे स्वर्गीय अजित दादा पवार सामाजिक संस्थेने ज्या कुटुंबामध्ये लेक जन्माला आली अशा कुटुंबाच्या घरी जाऊन दारात एक वृक्ष लागवड मुलीची आठवण म्हणून करण्याचा संकल्प केला. या उपक्रमाचा प्रारंभ पळसे गावातील हरीश पगार व सचिन विलास गायधनी यांच्या घरी जाऊन पेढे वाटून एक वृक्ष लावू दारी लाऊन करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे मार्गदर्शक श्रीधर



गायधनी, अध्यक्ष नंदू नरवाडे, कार्याध्यक्ष हिरामण गायधनी, उपाध्यक्ष प्रदीप गायधनी, सरचिटणीस बाळासाहेब गायधनी, हरीश पगार, सचिन गायधनी, सोमनाथ पगार, अशोक गायधनी, विलास गायधनी, बबनराव पगार, बन्सीलाल गायधनी, नामदेवराव गायधनी, शरद गायधनी उपस्थित होते.

## रिपब्लिकन सेना मुख्यमंत्र्यांना दाखवणार काळे झेंडे : शिंदे

**नाशिक । प्रतिनिधी**

अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या निर्णयाला विरोध दर्शवत रिपब्लिकन सेना आक्रमक झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (दि.१९ ) नाशिक दौऱ्यावर येत असताना त्यांना काळे झेंडे दाखवून निषेध करण्यात येणार असल्याची घोषणा रिपब्लिकन सेनेचे महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते अविनाश शिंदे यांनी पत्रकार परिषदेत केली.

आरक्षण उपवर्गीकरणाला अनुसूचित जातीतील मोठ्या



घटकांचा विरोध असतानाही सरकारकडून प्रक्रिया पुढे रेटली जात असल्याचा आरोप शिंदे यांनी केला. केवळ एका घटकाच्या मागणीचा आधार घेऊन उर्वरित ५९ उपजातींच्या भावना, भूमिका आणि आक्षेपांकडे दुर्लक्ष करणे हा सामाजिक न्यायाच्या मूलभूत भूमिकेलाच छेद देणारा प्रकार असल्याचे त्यांनी सांगितले. आरक्षणासारख्या संवेदनशील विषयावर कोणताही निर्णय घेण्यापूर्वी संबंधित समाजघटकांशी संवाद साधणे ही सरकारची जबाबदारी आहे. पक्षप्रमुख आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर मोर्चे निघत असताना चर्चा न करता निर्णय लादण्याचा प्रयत्न केल्यास तो रिपब्लिकन सेना कदापि स्वीकारणार नाही, असा इशारा शिंदे यांनी दिला.

उपवर्गीकरणाचा विषय सामाजिक न्यायाशी निगडित असल्याने आंबेडकरी समाजातील विविध नेते, संघटना आणि संबंधित घटकांशी मुख्यमंत्र्यांनी खुली चर्चा करावी. मात्र, या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी आंबेडकरी नेत्यांना भेटण्याचे मुख्यमंत्री टाळत असल्याचा आरोपही त्यांनी केला. सरकारने भूमिका बदलली नाही तर आंदोलन महाराष्ट्रभर तीव्र करण्यात येईल. नाशिकपासून आंदोलनाची ठिणगी पेटणारफ, असा इशारा देत महाराष्ट्र दौऱ्यावर येणाऱ्या मंत्र्यांना या प्रश्नावर जाब विचारण्याची भूमिका रिपब्लिकन सेनेने घेतल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले.

यावेळी महाराष्ट्र नेते विनय कटारे, जिल्हा महासचिव जिथेश शार्दुल, युवा सेना अध्यक्ष सुनील साळवे , कार्याध्यक्ष मारुती घोडेराव उपस्थित होते. सरकारने संघर्षाऐवजी संवादाचा मार्ग स्वीकारावा, अन्यथा नाशिकपासून सुरू होणारे आंदोलन महाराष्ट्रव्यापी जनआंदोलनात रूपांतरित करू, असा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.